MHLA150006162023

दाखल दिनांक – ०६/०६/२०२३
नोंदणी दिनांक – ०६/०६/२०२३
निकाल दिनांक– १५/०५/२०२६
कालावधी – वर्ष महिने दिवस
०२ ११ ०९

## सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, चाकुर यांचे न्यायालयात
### (पिठासिन अधिकारी दिव्या सारंग करभाजन)
### नियमित फौजदारी खटला क्र. १६१/२०२३

**नि.क्र. २४**

**अभियोग पक्ष** महाराष्ट्र शासन
चाकुर पोलीस ठाणे, जिल्हा लातूर.

**अभियोग पक्षातर्फे** श्री. व्ही. बी. तोटवाड
सहा. सरकारी अभियोक्ता

**आरोपी** हिरामण ऊर्फ पप्पू गणपती कांबळे
वय – ३५ वर्षे, धंदा – शेती,
रा. जानवळ ता. चाकुर जि. लातूर

**आरोपीतर्फे वकील** श्री. पी व्ही शेटे

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | | २३/०२/२०२३ |
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | | ७२/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | | ०३/०६/२०२३ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | | ०६/०६/२०२३ |
| दोषारोप ठेवलेचा दिनांक | | २७/११/२०२३ |

| | | |
|---|---|---|
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | | २४/०४/२०२५ |
| युक्तिवाद दिनांक | | २९/०४/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | | १५/०५/२०२६ |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | | ---- |

## आरोपींची माहिती

| अनु-क्रमांक | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपा-तील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा | फौ.प्र. सं.कलम ४२८ नुसार आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | हिरामण ऊर्फ पप्पू गणपती कांबळे | २३/०२/२०२३ | २४/०२/२०२३ | भा.दं.वि.सं.कलम ३५४, ३५४-बी, ३२३ अन्वये. | निर्दोष मुक्तता | --- | --- |

## अभियोग पक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्रमांक | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | गुरुनाथ गुंडाजी मोठेराव | १५ | पंच |
| अ.सा.क्र.२ | हीसमोद्दीन खाजमैनोद्दीन कुरेशी | २१ | ठाणे अंमलदार |

## अभियोग पक्षातर्फे सिध्द केलेले दस्तऐवज

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | १६ | पंच यांची सही |
| २ | २२ | तक्रार अर्ज |

## न्या य नि र्ण य

## (घोषित दिनांक १५/०५/२०२६)

आरोपी विरुध्द **भारतीय दंड विधान संहिता, १८६० कलम ३५४, ३५४–बी, ३२३ अन्वये दंडनीय अपराधाचा आरोप ठेवून प्रस्तुतचा खटला** चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की,**

**२.** दि. २३/०२/२०२३ पहाटे ४ वाजताच्या दरम्यान मौजे जाणवलं येथे वर्दीदर पहाटे प्रातर्विधी करण्यासाठी गेली होती तेव्हा, आरोपी हा तिच्या पाठीमागून जाऊन तिच्या अंगावरील गाऊन काढण्याचा प्रयत्न केला आणि वर्दीदाराच्या अंगाशी झोंबाझोंबी केली. जेव्हा वर्दीदाराने विरोध केला तेव्हा तिचा गाऊन फाडला आणि तिचे नातेवाईक आल्याचे पाहून तिला पोटावर खाली पडून पळून गेला. करीता फिर्यादीने आरोपी विरुद्ध फिर्याद दिली.

## अन्वेषण व दोषारोप

**३.** दिनांक २३/०२/२०२३ रोजी चाकुर पोलीस ठाणे, ता. चाकुर जि. लातूर येथील ठाणे अंमलदाराकडे फिर्यादीने लेखी वर्दी दिली, त्यावरुन दखलपात्र अपराध घडल्याचे निदर्शनास आल्यामुळे पहिली खबर क्रमांक–

७२/२०२३ वरील कलमाखाली नोंदविण्यात आली. पुढील अन्वेषण श्री. आर बी घाडगे पो उप नि यांच्याकडे सोपविण्यात आले. अन्वेषणादरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले. वरील आरोपींविरुध्द तपास पुर्ण केल्यानंतर फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम १७३(२) (यानंतर 'फौ.प्र.सं.') अन्वये अंतिम अहवाल न्यायालयात दाखल करण्यात आला.

**४.** अंतिम अहवाल व इतर कागदपत्रे पाहिल्यानंतर माझे पुर्वाधिकारी यांनी आरोपी विरुद्ध दोषारोप नि.क्र.५ नुसार ठेवण्यात आला. सदरचा दोषारोप आरोपीला वाचून दाखविण्यात आला व समजावून सांगण्यात आला. आरोपींनी सदर दोषारोपावर अपराध कबुल नाही असे नोंदविले व त्यांच्याविरुध्द संपरिक्षा चालविण्याची मागणी केली. अभियोग पक्षातर्फे वरील नमूद साक्षीदार तपासण्यात आले व पुरेशी संधी देऊन देखील अभियोग पक्ष साक्षिदार तपासू शकला नाही म्हणून त्यांचा पुरावा नि. १ वर आदेश करून बंद करण्यात आला. आरोपीचे फौ. प्र. सं. कलम ३१३ (१)(ब) नि २३ वर प्रमाणे निवेदन नोंदवले .

## <u>मुद्दे व निष्कर्ष</u>

**५.** अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील व आरोपीतर्फे विद्वान वकील यांचा युक्तिवाद ऐकला. वरील सर्व बाबींचा विचार केल्यानंतर व दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर खालीलप्रमाणे निर्णयीत करावयाचे मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबित केले आहे काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी वर्दीदार यांना मनास लज्जा | |

उत्पन्न होईल असे कृत्य केले ? ...नाही.

२. अभियोग पक्षाने हे शाबित केले आहे काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी वर्दीदार यांना वर्दीदाराने विरोध केला तेव्हा तिचा गाऊन फाडला व मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले ?

३. अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी फिर्यादी व साक्षीदार यांना ईच्छापुर्वक लाथा बुक्यांनी मारहाण करुन दुखापत केली? ...नाही.

४. कोणता आदेश ? आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते.

## <u>कारणमिमांसा</u>

## <u>मुद्दे क्रमांक १ ते ४ करिता</u>

**६.** मुद्दे क्र. १ ते ४ हे एकमेकांशी सुसंगत असल्यामुळे तसेच चर्चेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता ते चर्चेकरीता एकत्रीतपणे घेण्यात येतात. आरोपीचा अपराध सिद्ध करण्याची जबाबदारी सरकारी वकिलांवर आहे.

**७.** अभियोग पक्षातर्फे पंच यांना तपासण्यात आले. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये त्यांनी असे कथन केले आहे की, ते आरोपीला ओळखतात. पोलिसांनी त्यांना सही करण्यास सांगतले त्याप्रमाणे त्यांनी घटनास्थळ पंचानामा यावर सही केली. त्यांच्यासमोर घटनास्थळ पंचनामा झालेला नाही.

**८.** साक्षीदार अभियोग पक्षाच्या कथनास विसंगत अशी साक्ष देत असल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंतीवरुन **भारतीय पुरावा**

**कायदा कलम १५४ प्रमाणे** साक्षीदारांना उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. परंतु वर्दीदार व साक्षीदारांच्या साक्षी पुराव्यानुसार अभियोग पक्षाची सर्व कथने फेटाळुन लावली.

**९.** सदर प्रकरणामध्ये वारंवार वर्दीदाराला समन्स आणि वॉरंट पाठवून देखील त्या मिळून आल्या नाहीत. म्हणून ठाणे अंमलदार यांची साक्ष घेण्यात आली. त्यांनी असे कथन केले कि, दि. ०२/०२/२०२३ रोजी ठाणे अंमलदार या पदावर काम करत असताना वर्दीदर तक्रार घेऊन आल्या होती. त्यांच्या सांगण्याप्रमाणे त्यांनी तक्रार नि. २२ नोंदवून घेतली. त्यानंतर तपस पी एस आई घाडगे यांनी केला. उलट तपासामध्ये त्यांनी काबुल केले कि, तक्रार दाखल करताना त्यांनी वर्दीदाराकडून ओळखपत्र घेतले नाही. पुरेशी संधी देऊन देखील अभियोग पक्षातर्फे तापसी अंमलदाराची साक्ष नोंदवण्यात आलेली नाही.

**१०.** साक्षीदार क्र.१ ते २ यांच्या पुराव्याचे एकंदरीत अवलोकन केले असता आरोपी विरुध्द ठेवण्यात आलेला दोषारोपाबद्दल कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला दिसून येत नाही. अभियोग पक्षाच्या संपूर्ण पुराव्याचे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता तसेच आरोपीच्या विद्वान वकीलांचे युक्तिवाद एकत्रीतरित्या ऐकल्यानंतर आरोपी विरुध्द वर नमूद गुन्हे पुराव्याअभावी सिध्द होत नसल्याचे दिसून येते. अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द गुन्ह्याचे घटक सिध्द केले नाहीत. त्यामुळे, आरोपी विरुध्द गुन्हा शाबीत केल्याचे सिध्द होत नाही. म्हणुन मी मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविले आहेत.

## <u>मुद्दा क्रमांक ४ करिता</u>

**११.** वरील मुद्यांचे निष्कर्ष नकारार्थी दिल्यामुळे आरोपीला त्याच्या विरुद्ध लावण्यात आलेल्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करणे योग्य होईल. आरोपीस फौ.प्र.सं.कलम ४३७ (अ) प्रमाणे निकटतम अपिल न्यायालयासमोर उपस्थित होण्यासाठी पुढील सहा महिन्यांकरिता प्रतिभुतीसह जमानतपत्र देण्याचे निर्देश

देण्यात येत आहेत. अंततः मी मुद्दा क्र.४ च्या उत्तरात आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे असे म्हणुन पुढील अंतिम आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश</u>

०१. आरोपी हिरामण ऊर्फ पप्पू गणपती कांबळे यांची **भारतीय दंड विधान संहिता, १८६० कलम ३५४, ३५४–बी, ३२३** अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केल्याचे सिध्द न झाल्याने **फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१)** अन्वये त्यांची निर्दोष मुक्तता करण्यात येते.

०२. आरोपींनी पुर्वी दिलेले बंधपत्र व जामीनदाराचे जामीनखत, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम ४३७–अ च्या पुर्ततेसाठी पुढील सहा महिन्याकरीता पुढे कायम करण्यात येत आहे.

०३. न्यायनिर्णय **फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम ३५३(६) प्रमाणे** जाहीर करण्यात आलेला आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात देण्यात व घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by DIVYA
Date: 2026.05.15 16:05:06 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA

चाकुर (दिव्या सारंग करभाजन)
दिनांक : १५/०५/२०२६ सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
चाकुर

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | :- | Self |
| Name of the Court | :- | Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Chakur. |
| Date of Order/Judgment | :- | 15/05/2026 |
| Order/Judgment signed by Presiding Officer on | :- | 15/05/2026 |
| Order/Judgment uploaded on | :- | 15/05/2026 |